# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९१-२२ दिनांक २३/१२/२०२२

## रिक्षा चोरी करुन पायी जाणा-या इसमांना मारहाण करुन जबरी चोरी करणा-या आरोपीतांना २४ तासाचे आत अटक- पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १८/१२/२०२२ रोजी पहाटे ०३.३० वा. चे सुमारास फिर्यादी हे त्यांचे राहते घरी जाण्यासाठी नालासोपारा फाटा येथुन रिक्षाला हात करुन रिक्षामध्ये बसुन जात असतांना त्यांची रिक्षा रिलायन्स पेट्रोल पंपाचे पुढे ३० मिटर अंतरावर मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रं.८ चे गुजरात वाहिनीवरील सर्व्हिस रोडवर पेल्हार नालासोपारा(पु.), ता. वसई, जि. पालघर येथे आली असता रिक्षामधील फिर्यादी यांचे बाजुला बसलेले व रिक्षा चालविणारा असे तिन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ दमदाटी करुन ठोश्याबुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादी यांचेकडील मोबाईल फोन, हातातील घडयाळ व रोख रक्कम असा एकुण- १४,०००/- रुपये किंमतीचा ऐवज जबरीने घेवुन त्यांना चालत्या रिक्षातुन ढकलुन देवुन पळवुन गेले होत. सदरबाबत फिर्यादी-श्री.अजित जंगबहादुर यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तीन अनोळखी आरोपीतांवर पेल्हार पोलीस ठाणे येथे I गु.रजि.नं. १०६८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम- ३९४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक १८/१२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी दिलेल्या सुचनांनुसार नमुद गुन्हयातील रिक्षा व अनोळखी आरोपीत यांचा शोध घेणेकामी पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळी पथके तयार करुन गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे यातील आरोपीत नामे. १) रवि गुप्ता, वय-१९ वर्षे, २)विवेक राय, वय-२२ वर्षे, ३) अमित पासवान, वय-१९ वर्षे, सर्व रा. तुंगारफाटा, सातीवली, वसई (पु.) यांना गुन्हा दाखल झाले पासुन २४ तासाचे आत अटक करुन गुन्हयातील रोख रक्कम, मोबाईल फोन व घडयाळ असे आरोपीतांतकडून हस्तगत करुन तसेच इतर गुन्हयातील दोन ऑटो रिक्षा, वेगवेगळया कंपन्यांचे एकुण- १६ मोबाईल फोन, असा एकुण- २,३५,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I १०६८/२०२२,भा.दं.वि.सं.कलम-३९४,५०४,५०६,३४प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | पेल्हार | गु.रजि.नं. I ९७६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ४५७, ३८० प्रमाणे |
| ३ | पेल्हार | गु.रजि.नं. I ८०२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ४५७, ३८० प्रमाणे |
| ४ | वालीव | गु.रजि.नं. I १३२१/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | वालीव | गु.रजि.नं. I १३१५/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, प्रमाणे |
| ६ | डी.एन.नगर | गु.रजि.नं. I १०६७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, राहुल पवार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




----ooo----